पोलीस अधीक्षक कार्यालय,सातारा
सातारा तालुका पोलीस ठाणे जि.सातारा
फोन नं.०२१६२-२३८६०७

Email id-

sataratps.satara@mahapolice.gov.in

प्रेसनोट दिनांक ३१/१०/२०२६

ऊस वाहतुक करणारे ट्रक, ट्रॅक्टर व ट्रॉली यांना रिफ्लेक्टर लावुन अपघात रोखण्यासाठी सातारा तालुका पोलीसांनी केली उपाययोजना

आज दि.३१/१०/२०२६ रोजी सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दीत ऊस वाहतुक करणारे ट्रक, ट्रॅक्टर व ट्रॉली यामुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मा.श्री.निलेश तांबे पोलीस निरीक्षक सातारा तालुका पोलीस ठाणे यांनी अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना,शेंद्रे सातारा येथे सातारा तालुका पोलीस ठाणेचे वाहतूक पोलीस अंमलदार, अजिंक्यतारा कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.जिवाजी मोहिते, शेती अधिकारी विलासराव पाटील यांचेसह अजिंक्यतारा कारखाना येथे उपस्थित राहुन ऊस ट्रॉली चालक व मालक यांना ऊस वाहतूक करताना करावयाच्या उपाययोजना यांबाबत मार्गदर्शन केले तसेच आगामी काळात ऊस वाहतूक करणारे ट्रक व ट्रॅक्टर ट्रॉली यावर रिफ्लेक्टर लावुन वाहतूक करण्याच्या सुचना दिल्या व ऊस वाहतूक करणारे ट्रॉली व ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर लावणेत आला.तसेच दारु पिऊन वाहन न चालविणे व जोरजोराने साउंड वाजवू नये,रहदारीच्या ठिकाणी पार्किग करु नये याबाबत सुचना देण्यात आल्या.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री. .निखील पिंगळे, मा.अपर पोलीस अधिक्षक श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विपुल पाटील, पोलीस निरीक्षक श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली सातारा तालुका पोलीस ठाणेचे वाहतूक विभागाचे पो.हवा.सचिन घोरपडे ब.नं.६०२, रायसिंग घोरपडे ब.नं.४४१, अजित निकम ब.नं.२२७१,मालोजी चव्हाण ब.नं.१९७८,पोकॉ बगाडे ब.नं.८९८ शेंद्रे बिट चे अंमलदार सहा.फौजदार माने, लक्ष्मण साठे पोहवा ब.नं.१७४६,प्रदिप मोहिते पोहवा ब.नं.६३२, यांनी केली आहे.

सदर कारवाईमध्ये सहभाग घेणारे अधिकारी व अंमलदार यांचे मा.पोलीस अधीक्षक सो,सातारा व मा.अपर पोलीस अधीक्षक सो,सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

प्रति,

सर्व वृत्तपत्र संपादक सातारा